# जीपी पारसिक बँक

**गोपीनाथ पाटील पारसिक जनता सहकारी बँक लि.**

**(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)**

कळवा, ठाणे - ४०० ६०५.

(रजि. नं. एमएससीएस/सीआर/१२१३/२०१५ दि.२६/०३/२०१५)

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

बँकेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. १४ ऑगस्ट, २०१६** रोजी **सकाळी १०.३०** वाजता खालील विषयांकरीता **"गडकरी रंगायतन नाट्यगृह", तलावपाळी, ठाणे** येथे घेण्यांत येणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. दि. ९ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२. वार्षिक अहवाल विचारार्थ ठेवणे व त्यास मंजूरी देणे ज्यामध्ये संचालक मंडळ अहवाल, दि. ३१ मार्च, २०१६ अखेरचा वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल, नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांचा समावेश आहे.

३. सन २०१४-१५ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाच्या दोषदुरुस्ती रिपोर्टला मान्यता देणे.

४. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०१६ अखेरच्या नफा वाटणीस व लाभांश वाटणीस मंजूरी देणे.

५. सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

६. बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण तेलंगणा राज्यात वाढविणेबाबत मंजूरी घेणे.

७. बँकेचे पोटनियम क्र. १(a) १(d) व २ (x) मध्ये दुरुस्ती करणेबाबत मंजूरी देणे.

८. सर्वसाधारण सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर राहिल्यास त्यांची रजा मंजूर करणे.

९. सन २०१६-१७ करीता वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे सेवा शुल्क ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे. संचालक मंडळ मे. गोगटे ॲण्ड कंपनी यांची सन २०१६-१७ करीता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करण्याची शिफारस करीत आहे.

१०. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार बुडीत व संशयित येणे बाकी माफीस मंजूरी देणे.

११. मल्टी स्टेट को–ऑपरेटीव्ह सोसायटीज् ॲक्ट, २००२ च्या सेक्शन ३९ (३) नुसार संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जांचा तक्ता माहितीकरीता.

१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक : २८/०७/२०१६ — **सदानंद कृ. नायक**

ठिकाण : पारसिक नगर, कळवा, ठाणे – ४०० ६०५. — मुख्य कार्यकारी अधिकारी

**टीप :-** १) गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्या सभेस पोटनियम क्र. ३० (iii) नुसार गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.